# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर. ७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
पोस्ट बॉक्स : १४०७, फॅक्स : नं. : ९१-२०-२४५२८२९९
✆ ०२०-२४५२८१००, २४५२८२०० • E-MAIL : admin@msamb.com
Web Site : www.msamb.com


जा.क्र.कृपमं/प्रकल्प/बास/एएमआय/मासु२०१८/मुदतवाढ/२०२०/974 दि.२८/०६/२०२०

**परिपत्रक**

**विषय – Agriculture Marketing Infrastructure ( AMI) Scheme – मार्गदर्शक सुचना (Guidelines) व मुदत वाढ**

संदर्भ - कृषि, सहकार व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. एम११०११ /१२/न्युस्किम/२०१९-एएमआय (पीटी-२) दि. २५/०६/२०२०

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधा उभारुन मुल्यवृद्धी करण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयामार्फत सन २०१४ पासून Directorate of Marketing and Inspection (DMI) विभागामार्फत Agriculture Marketing Infrastructure ( AMI) Scheme राबवली जाते. सदरच्या योजनेमध्ये काही सुधारणा करुन कृषि मंत्रालयाने सन २०१८ रोजीच्या नविन मार्गदर्शक सूचना (Guidelines) प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार सदरची योजनेचा कालावधी दि. २२ ऑक्टोबर २०१८ ते दि. ३१ मार्च २०२० पुरता मर्यादित होता. तथापि संदर्भीय पत्रान्वये या योजनेस केंद्र शासनाने दि. ३१.३.२०२१ किंवा १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी अंमलात येण्याची तारीख या पैकी जी लवकर येईल त्या तारखेपर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्पाला दि. २२.१०.२०१८ रोजी किंवा तदनंतर अर्थसहाय्य मंजुर झालेले असणे आवश्यक आहे. या योजनेत राज्यातील पणन मंडळ/बाजार समित्यांना स्टेट एजन्सीचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्यामुळे योजनेतील ज्या घटकांचा लाभ घेणेस्तव पणन मंडळ/बाजार समित्या पात्र आहेत त्या प्रकल्पांना (साठवणूक सुविधा वगळून) अनुदानाची उच्चतम मर्यादा लागू असणार नाही.

या योजनेमध्ये खालील प्रकल्पांचा समावेश आहे.

१. **शेतकरी ग्राहक बाजार (Farmers Consumer Market) व ग्रामीण आठवडी बाजार (Rural Haats) यांची उभारणी करणे** :
   - शेतमाल उत्पादन क्षेत्राच्या जवळ शेतक-यांनी त्यांचा शेतमाल ग्राहकास किंवा घाऊक खरेदीदारांना विक्री करणेच्या उद्देशाने स्थापना करणेत येतात. यामध्ये Rural Primary Market, Village Haats, Farmer consumer market यांचा समावेश होतो.
   - प्रकल्पामधील पात्र सुविधा – ओपन/कव्हरड प्लॅटफॉर्म, शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, ड्रेनेज, अंतर्गत रस्ते, गारबेज पीट, कार्यालय, छोटे गोदाम, पॅकींगकरीता जागा, कुंपण इ.

- पात्र संस्था – पंचायत संस्था, बाजार समिती, स्टेट एजन्सी, शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था, वैयक्तिक, ट्रस्टी इ.
- अनुदान –
  - नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, पंचायत राज संस्था, महिला शेतकरी, अनुसुचित जाती जमातीतील उद्योजक किंवा त्यांच्या सहकारी संस्था यांना पात्र प्रकल्प खर्चाच्या ३३.३३ टक्के व जास्तीत जास्त रु. ३० लाख.
  - इतरांना पात्र प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के व जास्तीत जास्त रु. २५ लाख.

**२. शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था मार्फत सामुहीक सुविधा केंद्रांची उभारणी करणे:**

- देशामध्ये SFAC, NABARD व राज्य शासनांमार्फत शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करणेस प्रोत्साहन देणेत आले आहे. या शेतकरी उत्पादक कंपन्या त्यांच्या सभासदांच्या शेतमालाची मुल्यवृध्दी करणेचे कामकाज करीत आहेत. शेतक-यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांना विपणन सुविधा उभारणेस मदत करणेची गरज व्यक्त करण्यात आली आहे.
- प्रकल्पामधील पात्र सुविधा – शेतमाल वाळविणेची सुविधा (सोलर/साधी), इलेक्ट्रॉनिक वजनमापे, तपासणी यंत्रे, संगणक माहीती तंत्राज्ञान सुविधा, गोदाम, शीतगृह, झिरो एनर्जी फ्रिझर, पॅक हाऊस, रायपनिंग चेंबर्स, माहिती फलक (इलेक्ट्रनिक/साधा), डी शेलर, ग्रेन क्लिनर, मिनि डाळ मिल, मिनी ऑईल मिलर, मिनी राईस हलर इ. तसेच सहायक सुविधांमध्ये पार्कींग सुविधा, अंतर्गत रस्ते, गारबेज व्यवस्था, विद्युत सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इ चा समावेश आहे.
- पात्र संस्था – शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था.
- अनुदान –
  - नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, पंचायत राज संस्था, महिला शेतकरी, अनुसुचित जाती जमातीतील उद्योजक किंवा त्यांच्या सहकारी संस्था यांना पात्र प्रकल्प खर्चाच्या ३३.३३ टक्के व जास्तीत जास्त रु. ३० लाख.

**३. साठवणुक सुविधांची (गोदाम व सायलो) उभारणी करणे**

- गोदाम तसेच सायलो उभारणीकरीता अनुदान देय आहे. यामध्ये सहायक सुविधा जसे लोडींग अनलोडींग, बॅगींग सुविधा, यांचा समावेश होवू शकतो.
- प्रकल्पामधील पात्र सुविधा – ५० ते १०००० मे.टन क्षमतेचे गोदाम व अनुषंगीक सहायक सुविधा
- पात्र संस्था –
  - ५० ते ५००० मे.टन क्षमतेचे गोदाम उभारणी – वैयक्तिक, शेतकरी/उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या/संस्था, भागीदारी/प्रोप्रायटर संस्था, कंपनी, मंडळ, अशासकीय संस्था, स्वयं सहाय्यता गट, सहकारी संस्था, सहकारी मार्केटींग फेडरेशन, स्वायत्त शासकीय संस्था, स्थानिक प्राधिकरण, पंचयात राज संस्था, स्टेट एजन्सीज जसे राज्य

शासनाचे विभाग, बाजार समित्या, पणन मंडळ, वखार महामंडळ, नागरी पुरवठा महामंडळ इ.

- ५० ते १०००० मे.टन क्षमतेचे गोदाम उभारणी – स्टेट एजन्सीज जसे राज्य शासनाचे विभाग, बाजार समित्या, पणन मंडळ, वखार महामंडळ, नागरी पुरवठा महामंडळ इ.

- अनुदान –

| पात्र संस्था | भांडवली खर्चावर अनुदानाचा दर | अनुदान मर्यादा | | |
|---|---|---|---|---|
| | | ५० ते ५००० मे.टन (रु/मे.टन) | १००० मे.टन पेक्षा जास्त पणन १०००० मे.टनापर्यंत(रु/मे.टन) | अनुदान मर्यादा (रु. लाख) |
| नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, पंचायत राज संस्था, महिला शेतकरी, अनुसुचित जाती जमातीतील उद्योजक किंवा त्यांच्या सहकारी संस्था, स्वयं सहाय्यता गट | ३३.३३ % | ११६६.५५ | १०००.०० | १००.०० |
| इतर लाभार्थी | २५ % | ८७५.०० | ७५०.०० | ७५.०० |

## ४. विपणन सुविधांची उभारणी करणे:

- प्रकल्पामधील पात्र सुविधा –
  - प्राथमिक प्रक्रिया सुविधा – यामध्ये शेतमालाच्या स्वरुपात बदल न करणा-या प्राथमिक प्रक्रिया करणा-या सुविधा पात्र आहेत जसे शेतमालाची स्वच्छता, कटींग करणे, डी-पॉडींग, डी-कॉर्टीकेशन, डी-हस्कींग, डी-शेलींग करणे, ग्रेन क्लिनर, मिनी राईस हलर, वाळविणे यंत्र, ब्लिंचिंग,ग्रेडींग, सॉर्टींग, पॅकींग, लेबलींग, वॅक्सींग, रायपनिंग, चिलिंग, पाश्चरायझेशन, होमोजिनेशन, फ्रिजींग करणे इ. तसेच मिनी ऑईल एक्सपेलर फॉर इडीबल व्हेजिटेबल ऑईल, मिनी डाळ मिल ज्यामध्ये डाळीची स्वच्छता, प्रतवारी, सार्टींग, स्प्लीटींग, पॅकेजींग लेबलींग करणे, इ चा समावेश आहे.
  - बाजार समितीमधील सुविधा –
    - सामान्य सुविधा (common facilities) - लिलाव ओटे, शेतमालाचे लोडींग अनलोडींग, संकलन, वाळविणे, स्वच्छता, प्रतवारी, वजन करणे करिताच्या सुविधा, हाताळणी व तपासणी करीताच्या सुविधा इ.

- सहायक सुविधा (Ancillary facilities) – पार्कींग शेड, अंतर्गत रस्ते, गारबेज सुविधा, कुंपण, पिण्याचे पाणी व्यवस्था इ. (या सुविधांची किंमत ही एकूण पात्र अनुदानाच्या २५ टक्केपेक्षा जास्त असु नये).
- कार्यात्मक सुविधा (Functional Facilities) – शेतमालाचे संकलन/एकत्रित करणे, वाळविणे, स्वच्छता, ग्रेडींग, स्टँडर्डायझेशन, सॅनिटरी व फायटोसॅनिटरी सुविधा, प्रमाणिकरण प्रमाणपत्र, लेबलींग, पॅकेजिंग, रायपनिंग, वॅक्सींग, मुल्यवृध्दीकरीताच्या सुविधा इ. (या घटकामध्ये यंत्रसामुग्रीची किंमत ही एकुण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के पेक्षा जास्त पाहिजे.)

- पात्र संस्था – कृषि उत्पन्न बाजार समिती, नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, वैयक्तिक, शेतकरी गट इ.
- अनुदान –
    - पात्र प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के व जास्तीत जास्त रु. २५ लाख. तथापि बाजार समित्या या स्टेट एजन्सी असल्यामुळे त्यांना अनुदानाची मर्यादा नाही.

मार्गदर्शक सुचनांमधील इतर प्रमुख अटी व शर्ती.

- बाजार समित्यांनी प्रस्ताव सादर करणेची पद्दत
    - बाजार समिती बँकेकडुन कर्ज घेणार असल्यास बाजार समितीने रितसर मा. पणन संचालक यांच्या विहित परवानग्या घेवून बँकेकडे प्रस्ताव सादर करणे व बँकेकडुन कर्ज मंजुर झाल्यावर त बँकेमार्फत नाबार्डमार्फत प्रस्ताव डि एम आय कडे सादर करणे.
    - बाजार समिती स्वनिधीतुन प्रकल्प राबविणार असल्यास बाजार समितीने रितसर मा. पणन संचालक यांच्या विहित परवानग्या घेवुन प्रस्ताव पणन मंडळमार्फत डीएमआय, मुंबई कार्यालयास सादर करावा. तदनंतर तो प्रस्ताव डीएमआय, फरीदाबाद यांच्याकडे सादर होईल व सदरच्या प्रस्तावाचे NABCONS मार्फत छाननी होवून त्यांच्या अभिप्रायानुसार मंजुरी देणेत येईल.
    - बाजार समिती पणन मंडळाकडुन कर्ज घेवुन प्रकल्प राबविणार असल्यास बाजार समितीने रितसर मा. पणन संचालक यांच्या विहित परवानग्या घेवून पणन मंडळाचे कर्ज मंजुर करुन घेवून प्रस्ताव पणन मंडळामार्फत डीएमआय, मुंबई कार्यालयास सादर करावा. तदनंतर तो प्रस्ताव डीएमआय, फरीदाबाद यांच्याकडे सादर होईल व सदरच्या प्रस्तावाचे NABCONS मार्फत छाननी होवुन त्यांच्या अभिप्रायानुसार मंजुरी देणेत येईल.
- योजनेत प्राप्त होणारे अनुदान हे कर्जाशी निगडीत आहे (back-ended). तथापि स्टेट एजन्सी म्हणुन पात्र असणा-या लाभार्थींनी स्वनिधीतुन प्रकल्प उभारल्यास अनुदान मिळणेकरीता पात्र आहेत.

- लाभार्थींचा स्वनिधी कमीत कमी प्रकल्प खर्चाच्या २० टक्के असणे आवश्यक आहे. ज्या लाभार्थींना कर्ज काढणे आवश्यक आहे त्यांना प्रकल्प खर्चाच्या कमीत कमी ५० टक्के कर्ज असणे आवश्यक आहे.

या योजनेच्या सविस्तर माहितीकरिता Directorate of Marketing and Inspection (DMI) मुंबई कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ईमेल पत्ता खालील प्रमाणे आहे.

**Deputy Agricultural Marketing Advisor**,
Directorate of Marketing & Inspection,
New CGO Building, 3rd Floor,
New Marine Lines, Mumbai – 400 020
Phone – 022/2206801/22032699 Email – dmiromah@nic.in

याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना ( Operational Guidelines 2018 ) सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत. त्यामधील सूचना व निकष अंतिम समजण्यात याव्यात व आपले प्रस्ताव अनुदानासाठी सादर करून जास्तीत जास्त पात्र संस्था/बाजार समित्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

( सुनिल पवार )
**कार्यकारी संचालक**
**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे**

प्रति,
**मा. सभापती / सचिव,**
**कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)**

प्रत माहितीस्तव

१) मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे
२) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व विभाग)
३) जिल्हा उपनिंबधक, सहकारी संस्था, सर्व जिल्हे
४) विभागीय उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, (सर्व विभाग)
५) अग्रीकल्चर बिझनेस मार्केटींग एक्सपर्ट, पणन मंडळ (सर्व)